Chief Executive Officer shall pass an order on the claim or objection and such order shall be final and no revision against it shall lie to any authority whatsoever.

(4) The record of the proceedings shall consist of the claim or objection, a note of the date and place of hearing and of the attendance of parties and witnesses and an order stating as briefly as possible the decision and the grounds therefor.

(5) Appearance by counsel shall not be permitted.

6. The Chief Executive Officer shall cause the electoral roll to be corrected in accordance with such orders, if any, as may have been passed under rule 5 and shall publish the electoral roll as amended in manuscript, in the manner prescribed for the first publication of the electoral roll. Clerical errors in the electoral roll may be corrected at any time up to the date of election, on a reference by an elector to the Chief Executive Officer.

7. (1) An electoral roll republished under rule 6 shall come into force from the date of republication and shall continue in force for a period of five years, after which period the roll shall be revised.

Provided that the State Government may, by order, direct the revision of the roll, in whole or in part, at any time before the expiration of the said period.

(2) These rules shall apply to each subsequent revision of the roll as they apply to the preparation of the roll.

8. An authentic copy of the current electoral roll shall be maintained in the Corporation office and shall be available for inspection by a duly nominated candidate free of charge and by any other person on payment of such fees as the Corporation may by resolution prescribe.

9. If there is any discrepancy between any duplicate copy of the current electoral roll supplied to any person by the Corporation and the authentic copy thereof maintained under rule 8, the entry in the latter copy shall prevail for the purposes of the election.

10. If a ward or special constituency is called upon to elect a counciller after an electoral roll has ceased to be in force and before the republication of the revised electoral roll, the old roll shall, for the purposes of that election continue to operate as the electoral roll for that ward or special constitue[illegible]y.

11. These rules shall, so [illegible]r as may be, apply also to the preparation of a register of electors under sub-section (2) of section 429 of the Act.

NOTIFICATION NO. 230-1965-M-XIII DATED THE 15TH JANUARY 1952.

**Rule for the exercise of votes by persons holding qualifications in more than one ward or Special Constituency.**

**( Under Section 10 )**

---

If a person possesses qualifications under sub-section (1) or (2) of section 12 in more than one ward or more than one Special Constituency he shall within a period of 15 days from the date on which the electoral roll is re-published under rule 6 declare to the Chief Executive Officer the ward or the special constituency in which he proposes to vote and in the event of his failing to make such declaration within the time prescribed above, he shall not be entitled to vote in the election of any ward.

---

NOTIFICATION NO. 230-1965-M-XIII DATED THE 15TH JANUARY 1952.

## Rule prescribing the qualifications of a person entitled to vote at an election of a Councillor representing the registered Trade Unions Constituency under section 9 (I) (c)

**(Under section 12 (2))**

---

Every person who is a member of a registerel trade union having its registered office at Nagpur and who possesses the age qualification as specified in section 12(I) and residential qualification within the meaning of section 11 of the Act shall be entitled to vote at an election of a Councillor under section 9 (1) (C) of the Act.

---

NOTIFICATION NO. 230-1965-M-XIII DATED THE 15TH JANUARY 1952.

**Rule prescribing the manner in which every election, selection or appointment of a Councillor and every election of the Mayor or Deputy Mayor shall be notified.**

**( Under Section 16 )**

---

Every election, selection or appointment of a councillor and every election of the Mayor or Deputy Mayor shall be reported by the Chief Executive Officer to the State Government which shall publish the same in Madhya Pradesh Gazette.

---

रजिस्टर्ड नं. टीईसाएच/४७-३०३/एमबीआय/२००१-०५

असा. क्र. ११

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

### प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, फेब्रुवारी ११, २००५/माघ २२, शके १९२६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—मध्य उप-विभाग

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ फेब्रुवारी २००५

**अधिसूचना**

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९.**

**क्रमांक बीएनएम. ५००५/४६/प्र.क्र.७/नवि-३२.**—ज्याअर्थी, विवक्षित महानगरपालिकांच्या महापौर आणि उप महापौर या पदांसाठीच्या निवडणुका फेब्रुवारी, २००५ च्या तिसऱ्या आठवड्यात घेतल्या जाण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त प्रयोजनांकरिता नियम करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे आणि त्या प्रयोजनार्थ त्या नियमांच्या पूर्वप्रसिद्धीची शर्त काढून टाकणे ज्यांमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबाबत महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे ;

त्याअर्थी आता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा महाराष्ट्र ५९) याच्या कलम ४५६ अ, पोट-कलम (१) आणि पोट-कलम (२) चे परंतुक याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख हे जेथवर महानगरपालिकेच्या महापौर आणि उप महापौर या पदांसाठीच्या निवडणुका घेण्यासंबंधात लागू असतील तेथवर, त्यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, पुढील नियम करीत आहे, ते असे :-

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—(१) या नियमांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उप महापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम, २००५ असे म्हणावे.

(२) ते तात्काळ अंमलात येतील.

## नमुना एक

[नियम ४ (अ) पहा]

.............................................. महानगरपालिकेच्या महापौर/उप महापौर पदासाठीची निवडणूक.

मी, याद्वारे, .................................................................................... यांना .............................................. महानगरपालिकेच्या महापौर/उप महापौर पदासाठीच्या निवडणुकीकरिता उमेदवार म्हणून नामनिर्देशित करीत आहे.

उमेदवाराचे पूर्ण नाव : ............................................................................

उमेदवाराचा टपालाचा संपूर्ण पत्ता : ............................................................................

उमेदवार हा पालिका सदस्य म्हणून जेथून निवडून आला त्या प्रभागाचे/पॅनलचे नाव/क्रमांक : ..............................................

सूचकाचे पूर्ण नाव : ............................................................................

(सूचकाची सही)

अनुमोदकाचे पूर्ण नाव : ............................................................................

दिनांक :

(अनुमोदकाची सही)

२. व्याख्या.—या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर—

(अ) " महानगरपालिका " याचा अर्थ, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा ५९) याच्या तरतुदी अन्वये घटित करण्यात आलेली महानगरपालिका, असा आहे ;

(ब) या नियमांमध्ये, महानगरपालिकेच्या संबंधात वापरलेल्या, परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना उक्त अधिनियमामध्ये जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल.

३. **महापौर आणि उप महापौर या पदांची निवडणूक घेण्यासाठी विशेष बैठक.**—(१) महानगरपालिकेच्या महापौर आणि उप महापौर या पदांच्या निवडणुका घेण्यासाठी महानगरपालिका विशेष बैठक घेईल.

(२) नगरपालिका सचिव, मावळत्या महापौराशी विचारविनिमय केल्यानंतर आणि महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर, महापौराची निवड करावयाची असल्यास, पालिका आयुक्ताशी विचारविनिमय केल्यानंतर, पोट-नियम (१) अन्वये विशेष बैठक घेण्यासाठी तारीख निश्चित करील :

परंतु, अशा बैठकीच्या किमान पूर्ण तीन दिवस आधी, पालिका सदस्यास उक्त पदांसाठी आपले नामनिर्देशन सादर करता येईल अशा रीतीने ती तारीख निश्चित करण्यात येईल.

(३) अशी बोलावलेली विशेष बैठक रद्द किंवा तहकूब करता येणार नाही.

४. **नामनिर्देशन पत्र सादर करणे.**—(१) उक्त पदांसाठी निवडणूक लढविण्याची इच्छा असलेला कोणताही पालिका सदस्य, या नियमांसोबत जोडलेल्या नमुना-एक मधील आपले नामनिर्देशन नगरपालिका सचिवाकडे नामनिर्देशासाठी निश्चित केलेल्या तारखेस जातीने सादर करील.

(२) प्रत्येक नामनिर्देशनपत्रात उमेदवाराचे पूर्ण नाव नमूद केलेले असेल आणि त्यावर एका पालिका सदस्याने सूचक म्हणून व दुसऱ्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केलेली असेल ;

(३) कोणताही पालिका सदस्य एकापेक्षा अधिक उमेदवारांची नामनिर्देशने सूचित करणार नाही किंवा त्यास अनुमोदन देणार नाही ;

(४) या नियमातील कोणतीही गोष्ट, कोणत्याही उमेदवारास एकापेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रे सादर करण्यापासून प्रतिबंध करणार नाही :

परंतु, कोणत्याही उमेदवाराकडून किंवा त्याच्या वतीने चारपेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रे सादर करण्यात येणार नाहीत.

५. **पीठासीन प्राधिकारी.**— (१) महापौराची निवड करण्यासाठी बोलावलेल्या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी विद्यमान महापौर किंवा त्याच्या अनुपस्थितीत उप महापौर असेल ;

(२) जर विद्यमान महापौर किंवा उप महापौर हा, महापौर पदाची निवडणूक लढवीत असेल तर, तो त्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविण्यास हक्कदार नसेल ;

(३) जर, महापौरास किंवा उप महापौरास, पूर्वगामी पोटनियमाच्या तरतुदीनुसार बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविण्यास अशा रीतीने प्रतिबंधित करण्यात आले असेल तर, महापालिकेचा निवडून आलेला ज्येष्ठतम सदस्य त्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवील.

६. **नामनिर्देशनाची छाननी करणे व उमेदवारी मागे घेणे.**—(१) नगरपालिका सचिवाला प्राप्त झालेली सर्व नामनिर्देशने, बैठकीच्या दिवशी, बैठक सुरू झाल्यानंतर, पीठासीन प्राधिकाऱ्याकडे सुपूर्द करण्यात येतील ;

(२) पीठासीन प्राधिकारी, अशा रीतीने प्राप्त झालेल्या सर्व नामनिर्देशनांची छाननी करील आणि त्यास, नियम ४ चे उल्लंघन करून स्वाक्षरी केलेले नामनिर्देशने फेटाळता येतील. नंतर पिठासीन प्राधिकारी, वैधपणे नामनिर्देशित केलेल्या सर्व उमेदवारांची नावे वाचून दाखवील ;

(३) कोणत्याही उमेदवारास पूर्ववर्ती पोट-नियमान्वये यथोचितरित्या नामनिर्देशित केलेल्या पालिका सदस्यांची नावे वाचून दाखविल्यानंतर १५ मिनिटांच्या आत, त्याने सही केलेली लेखी नोटीस पीठासीन अधिकाऱ्याकडे देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल ;

(४) पोट-नियम (३) अन्वये, आपली उमेदवारी मागे घेण्याची नोटीस देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, ती नोटीस रद्द करण्याची परवानगी असेल ;

(५) पीठासीन अधिकारी, आपली उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नावे पालिका सदस्यांना वाचून दाखवील.

७. **निवडणूक प्रक्रिया आणि निवडणुकीचे निकाल घोषित करणे.**—(१) जर एकच वैध नामनिर्देशन करण्यात आले असेल तर, महापौरपदासाठी त्याची निवड झाल्याचे जाहीर करण्यात येईल.

(२) जर एकापेक्षा अधिक नामनिर्देशने करण्यात आली असतील तर, पीठासीन अधिकारी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे वर्णानुक्रमाने लावील.

(३) पीठासीन अधिकारी, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराचे नाव वर्णानुक्रमाने घोषित करील आणि हात वर करून मतांची नोंद घेईल. ज्यांनी त्या उमेदवाराच्या बाजूने मत दिले असेल अशा पालिका सदस्यांची नावे कार्यवृत्तात नोंदविण्यात येतील ;

(४) पीठासीन अधिकारी पुढील गोष्टींची खात्री करून घेईल,—

(एक) मत देण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक पालिका सदस्याला आपले मत देण्यासाठी रास्त व वाजवी संधी देण्यात आली आहे आणि अशा रीतीने दिलेले मत, ते ज्याला दिले असेल त्या उमेदवाराच्या नावासमोर योग्य रीतीने नोंदविण्यात आले आहे ;

(दोन) ज्याचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे अशा पालिका सदस्यास पुन्हा मत देण्याची किंवा आपले मत बदलण्याची मुभा असणार नाही.

(५) पीठासीन अधिकारी, ज्यांनी मतदान केलेले नाही अशा पालिका सदस्यांच्या नावांचीही नोंद करील ;

(६) पीठासीन अधिकारी, ज्यांनी मतदान केले आहे किंवा मतदान केलेले नाही अशा पालिका सदस्यांच्या नावांची नोंद करील आणि निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारास प्राप्त झालेल्या मतांची संख्या घोषित करील ;

(७) निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या घोषित केल्यानंतर पीठासीन अधिकारी निकाल घोषित करण्याची कार्यवाही करील. ज्या उमेदवाराला मतदानात सर्वात जास्त मते पडतील तो उमेदवार रीतसर निवडून आल्याचे घोषित करण्यात येईल ;

(८) मते समसमान मिळाल्यास पीठासीन अधिकारी असे घोषित करील की, निवडणुकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून सोडतीद्वारे ठरविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले पालिका सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठ्ठी काढण्यात येईल ;

(९) ज्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी असेल तो उमेदवार उक्त पदावर वैध रीतीने निवडून आला असल्याचे घोषित करण्यात येईल ;

(१०) मुक्त व निर्भयपणे निवडणुका पार पाडण्यासाठी पीठासीन अधिकारी, कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था करील ;

(११) निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी आणि बैठकीच्या कामकाजाची नोंद घेण्यासाठी पालिका सचिव पीठासीन अधिकाऱ्यास सहाय्य करील.

८. **उप महापौर पदासाठी निवडणूक.**—महापौर पदाच्या निवडणुकीसाठीची प्रक्रिया, योग्य त्या फेरफारांसह, उप महापौर पदासाठीच्या निवडणुकीसाठी लागू असेल. मात्र, नव्याने निवडून आलेले महापौर हे, उप महापौर पदाच्या निवडणुकीसाठी पीठासीन अधिकारी असतील.

## उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र

मी, मतदार, या नामनिर्देशनाला अनुमती देत आहे आणि माझी निवड झाल्यास, ........................................ महानगरपालिकेचा महापौर/उप महापौर म्हणून काम करण्याची तयारी दर्शवीत आहे.

दिनांक : (उमेदवाराची सही)

(नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने भरावयाचे )

* सूचकाने/उमेदवाराने दाखल केलेल्या,

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक ........................................ (वेळ) ........................................ (दिनांक) ........................................

दिनांक : ( अधिकाऱ्याची सही )

---

* जे लागू नसेल ते खोडावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

के. एन. खवारे,
शासनाचे सह सचिव.

# URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 11th February 2005

*NOTIFICATION*

THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949.

No. BNM. 5005/46/CR-7/UD-32.—Whereas, elections for the offices of Mayors and Deputy Mayors of certain Municipal Corporations are likely to be held in the third week of February 2005;

And whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action to make rules for the purposes aforesaid and for that purpose to dispense with the condition of previous publication thereof;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and the proviso to sub-section (*2*) of section 456A of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (Bom.LIX of 1949) and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of all existing rules, orders or instruments, in so far as they relate to the conduct of elections for the offices of Mayors and Deputy Mayors of the Corporation, the Government of Maharashtra hereby makes the following rules; namely :—

1. *Short title and commencement.*—(*1*) These Rules may be called the Bombay Provincial Municipal Corporations (Conduct of elections to the office of Mayor and Deputy Mayor ) Rules, 2005.

(*2*) They shall come into force at once.

2. *Definitions.*—In these Rules, unless the context otherwise requires ,—

(a) " Municipal Corporation " means a Municipal Corporation constituted under the provisions of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (Bom. LIX of 1949) ;

(b) words and expressions used but not defined herein shall, in relation to a Municipal Corporation, have the same meanings as assigned to them in the said Act.

3. *Special meeting for Election to the office of Mayor and Deputy Mayor.*—(*1*) For the purpose of holding elections to the office of Mayor and Deputy Mayor of the Corporation, a special meeting shall be held by the Corporation.

(*2*) The Municipal Secretary shall, in consultation with the outgoing Mayor and in case, the Mayor is to be elected after General Elections to the Corporation, in consultation with the Municipal Commissioner, fix a date for holding the special meeting under sub-rule (1) :

Provided that, the date shall be so fixed, as to enable a Councillor to submit his nomination to the said posts, at least three clear days prior to such meeting.

(*3*) The special meeting so called, shall not be cancelled or adjourned.

4. *Submission of nomination paper.*—(*1*) Any councillor who intends to contest the election to the said posts shall submit his nomination in the Form-I appended to these rules on the day fixed for nominations to the Municipal Secretary in person.

(*2*) Each nomination paper shall state the name of the candidate in full and be subscribed by one councillor as proposer and another as seconder.

(*3*) No Councillor shall propose or second the nomination of more than one candidate.

(*4*) Nothing in this Rule shall prevent any candidate from submitting more than one nomination paper :

Provided that, not more than four nomination papers shall be presented by or on behalf of any candidate.

5. *Presiding Authority.*—(*1*) The special meeting to elect the Mayor shall be presided over by the existing Mayor or in his absence by the Deputy Mayor.

(*2*) If the existing Mayor or the Deputy Mayor is contesting the election to the post of Mayor he shall not be entitled to preside over the meeting.

(*3*) If Mayor or the Deputy Mayor is so prohibited to preside over the meeting under the provisions of foregoing sub-rule, the senior most elected member of the Corporation shall preside over the meeting.

6. *Scrutiny of nomination and withdrawal of candidature.*—*(1)* All nominations received by the Municipal Secretary shall be handed over to the presiding authority on the day of meeting, after the meeting begins.

*(2)* The presiding authority shall scrutinise all the nominations so received and may reject the nominations subscribed in contravention of Rule 4. The presiding authority shall then read out the names of all validly nominated candidates.

*(3)* Any candidate may withdraw his candidature by notice in writing subscribed by him and delivered to the presiding authority within 15 minutes from the time of reading out the names of duly nominated Councillors under the preceding sub-rule.

*(4)* No person who has given a notice of withdrawal of his candidature under sub-rule (3) shall be allowed to cancel the notice.

*(5)* The presiding authority shall, read out to the councillors present, the name of the candidates withdrawing their candidatures.

7. *Election procedure and the declaration of election result.*—*(1)* If there is only one valid nomination the presiding authority shall declare such candidate as duly elected candidate to the post of Mayor.

*(2)* If the number of validly nominated candidates is more than one the presiding authority shall arrange the names of contesting candidates in alphabetical order.

*(3)* The presiding authority shall announce the name of each contesting candidate in the alphabetical order and shall take voting by show of hands. The names of the councillors who have voted in favour of that candidate shall be recorded in the minutes.

*(4)* The presiding authority shall ensure that,—

(i) every member who desires to cast his vote is given fair and reasonable opportunity of casting his vote and the vote so cast is recorded properly against the name of the candidate in whose favour the vote is cast;

(ii) the councillor, whose vote is recorded once shall not be allowed to recast or change his vote.

*(5)* The presiding authority shall also record the names of those Councillors who abstain from voting.

*(6)* The presiding authority after recording the names of the Councillors who have voted or abstained from voting, shall announce the number of votes secured by each contesting candidate.

*(7)* The presiding authority after declaring the number of votes polled by each contesting candidate shall proceed to declare the result. The candidate who polls highest number of votes shall be declared as duly elected.

*(8)* In case of equality of votes the presiding authority shall declare that the result of the election shall be decided by drawing lots. The lots will be drawn by such person as may be decided by the majority of the Councillors present and entitled to vote.

*(9)* The candidate on whom the lot falls shall be declared to be validly elected to the said post.

*(10)* The presiding authority besides recording the proceedings in writing shall also cause the proceedings to be recorded by way of videography, to ensure free and fair elections.

*(11)* The Municipal Secretary shall assist the presiding authority in conducting the election process and recording the proceedings of the meeting.

8. *Election to the post of Deputy Mayor.*—The procedure for the election to the post of Mayor shall *mutatis mutandis* apply for the election to the post of Deputy Mayor excepting that the newly elected Mayor shall be the presiding authority for the election to the post of Deputy Mayor.

FORM-I

[ *See* Rule 4 (a) ]

Election to the office of Mayor/Deputy Mayor ..............................Municipal Corporation.

I hereby nominate ........................................ as a candidate for election to the office of Mayor/ Deputy Mayor of the ..............................................Municipal Corporation.

Full name of the candidate...................................................................................................

Full postal address of the candidate.......................................................................................

Name/Number of the ward/panel from which the ............................... candidate is elected as Councillor.

Full name of the proposer ....................................................

(Signature of the proposer)

Full name of the seconder ....................................................

(Signature of the seconder )

Date .........................

**Declaration by the candidate**

I hereby assent to this nomination and signify my willingness to act as Mayor/Deputy Mayor of the .................................................. Municipal Corporation if elected.

(Signature of the candidate)

Date : .........................

( To be filled by officer appointed to receive nomination papers)

Serial No. of the nomination paper ...................................... ( hour ) on ............................................. ( date) by the * proposer/candidate.

(Signature of the officer)

Date : .........................

* Score out the word not applicable.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

K. N. KHAWAREY,

Joint Secretary to Government.

नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ११ फेब्रुवारी २००५

## अधिसूचना

नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८.

क्रमांक एनएमसी. ५००५/४९/प्र.क्र.७/नवि-३२.—ज्याअर्थी, नागपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर आणि उप महापौर पदांसाठीच्या निवडणुका फेब्रुवारी, २००५ च्या तिसऱ्या आठवड्यात घेतल्या जाण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त प्रयोजनाकरिता नियम करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे आणि प्रयोजनार्थ त्या नियमांच्या पूर्वप्रसिद्धीची शर्त काढून टाकणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे ;

त्याअर्थी, आता, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा मध्यप्रांत व व-हाड अधिनियम - २) याच्या कलम ४२० पोट-कलम १ चे परंतुक याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबतीत त्यास समर्थ करणा-या अधिकारांचा वापर करून आणि सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख हे जेथवर उक्त महानगरपालिकेच्या महापौर आणि उप महापौर या पदांसाठीच्या निवडणुका घेण्यासंबंधात लागू असतील तेथवर, त्यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, पुढील नियम करीत आहे ते असे :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—(१) या नियमांना नागपूर शहर महानगरपालिका (महापौर आणि उप महापौर या पदांसाठीच्या निवडणुका घेणे) नियम, २००५, असे म्हणावे.

(२) ते तात्काळ अंमलात येतील.

२. **व्याख्या.**—या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " महानगरपालिका " याचा अर्थ नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ ( १९५० चा मध्यप्रांत व व-हाड अधिनियम-२ ) यांच्या तरतुदीअन्वये गठीत करण्यात आलेली महानगरपालिका असा आहे ;

(ब) या नियमामध्ये महानगरपालिकेच्या संबंधात वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना उक्त अधिनियमामध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

३. **महापौर व उप महापौर या पदांची निवडणूक घेण्यासाठी विशेष बैठक.**—(१) महानगरपालिकेच्या महापौर आणि उप महापौर या पदांच्या निवडणुका घेण्यासाठी महानगरपालिका विशेष बैठक घेईल .

(२) नगरपालिका सचिव मावळत्या महापौरांशी विचारविनिमय केल्यानंतर आणि महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर महापौरांची निवड करावयाची असल्यास पालिका आयुक्तांशी विचारविनिमय केल्यानंतर, पोट-नियम (१) अन्वये विशेष बैठक घेण्यासाठी तारीख निश्चित करील.

परंतु , अशा बैठकीच्या किमान पूर्ण तीन दिवस आधी पालिका सदस्यांस उक्त पदांसाठी आपले नामनिर्देशन सादर करता येईल अशारितीने ती तारीख निश्चित करण्यात येईल.

(३) अशी बोलावलेली विशेष बैठक रद्द किंवा तहकूब करता येणार नाही.

४. **नामनिर्देशनपत्र सादर करणे.**—(१) उक्त पदांसाठी निवडणूक लढविण्याची इच्छा असलेला कोणताही पालिका सदस्य, या नियमासोबत जोडलेल्या नमुना-१ मध्ये आपले नामनिर्देशन, पालिका सचिवांकडे नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या तारखेस जातीने सादर करील.

(२) प्रत्येक नामनिर्देशनपत्रात उमेदवाराचे पूर्ण नाव नमूद केलेले असेल आणि त्यावर एका पालिका सदस्याने सूचक म्हणून व दुस-याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केलेली असेल.

(३) कोणताही पालिका सदस्य एकापेक्षा अधिक उमेदवारांची नामनिर्देशन सूचित करणार नाही किंवा त्यास अनुमोदन देणार नाही.

(४) या नियमातील कोणतीही गोष्ट, कोणत्याही उमेदवारास एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे सादर करण्यापासून प्रतिबंध करणार नाही ; परंतु, कोणत्याही उमेदवाराकडून किंवा त्याच्या वतीने चारपेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे सादर करण्यात येणार नाहीत.

५. **पिठासीन अधिकारी.**—(१) महापौरांची निवड करण्यासाठी बोलाविलेल्या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी विद्यमान महापौर किंवा त्यांच्या अनुपस्थितीत उप महापौर असेल.

(२) जर विद्यमान महापौर किंवा उप महापौर हा, महापौर पदाची निवडणूक लढवित असेल तर, तो त्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविण्यास हक्कदार नसेल.

(३) ११. महापौरास किंवा उप महापौरास पूर्वगामी पोट-नियमाच्या तरतुदीनुसार बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविण्यास असमर्थ असल्याचे कळविण्यात आले असेल तर, महापौरांच्या निवडून आलेला ज्येष्ठतम सदस्य त्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवील.

६. **नामनिर्देशनाची छाननी करणे व उमेदवारी मागे घेणे.**—(१) पालिका सचिवाला प्राप्त झालेली सर्व नामनिर्देशने बैठकीच्या दिवशी बैठक सुरू झाल्यानंतर पिठासीन अधिकाऱ्याकडे सुपूर्द करण्यात येतील.

(२) पिठासीन प्राधिकारी अशारितीने प्राप्त झालेल्या सर्व नामनिर्देशनाची छाननी करील आणि त्यास नियम चार चे उल्लंघन करून स्वाक्षरी केलेले नामनिर्देशने फेटाळता येतील. नंतर पिठासीन प्राधिकारी वैधपणे नामनिर्देशित केलेल्या सर्व उमेदवारांची नावे वाचून दाखवील.

(३) कोणत्याही उमेदवारास, पूर्ववर्ती पोट-नियमान्वये यथोचितरित्या नामनिर्देशित केलेल्या पालिका सदस्यांची नावे वाचून दाखविल्यानंतर पंधरा मिनिटांच्या आत, त्याने सही केलेली लेखी नोटीस पिठासीन अधिकाऱ्याकडे देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल.

(४) पोट- नियम (३) अन्वये, आपली उमेदवारी मागे घेण्याची नोटीस देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस ती नोटीस रद्द करण्याची परवानगी असेल.

(५) पिठासीन अधिकारी, आपली उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नावे पालिका सदस्यांना वाचून दाखवील.

७. **निवडणूक प्रक्रिया व निवडणूक निकाल घोषित करणे.**—(१) जर एकच वैध नामनिर्देशन करण्यात आले असेल तर महापौर पदासाठी त्याची निवड झाल्याचे जाहीर करण्यात येईल.

(२) जर एकापेक्षा अधिक नामनिर्देशने करण्यात आली असतील तर, पिठासीन अधिकारी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे वर्णानुक्रमे लावील.

(३) पिठासीन अधिकारी, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराचे नाव वर्णानुक्रमे घोषित करील आणि हात वर करून मतांची नोंद घेईल. ज्यांनी त्या उमेदवाराच्या बाजूने मत दिले असेल अशा पालिका सदस्यांची नावे कार्यवृत्तांत नोंदविण्यात येतील.

(४) पिठासीन अधिकारी पुढील गोष्टींची खात्री करून घेईल :—

(एक) मत देण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक पालिका सदस्याला आपले मत देण्यासाठी रास्त व वाजवी संधी देण्यात आली आहे, आणि अशारितीने दिलेले मत, ते ज्याला दिले असेल त्या उमेदवाराच्या नावासमोर योग्यरितीने नोंदविण्यात आले आहे ;

(दोन) ज्याचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे अशा पालिका सदस्यांस पुन्हा मत देण्याची किंवा आपले मत बदलण्याची मुभा असणार नाही.

(५) पिठासीन अधिकारी, ज्यांनी मतदान केलेले नाही अशा पालिका सदस्यांच्या नावाचीही नोंद करील.

(६) पिठासीन अधिकारी ज्यांनी मतदान केले आहे किंवा मतदान केलेले नाही अशा पालिका सदस्यांच्या नावाची नोंद करील आणि निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारास प्राप्त झालेल्या मतांची संख्या घोषित करील.

(७) निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या घोषित केल्यानंतर पिठासीन अधिकारी निकाल घोषित करण्याची कार्यवाही करील. ज्या उमेदवाराला मतदानात सर्वात जास्त मते पडतील तो उमेदवार रितसर निवडून आल्याचे घोषित करण्यात येईल.

(८) मते समसमान मिळाल्यास पिठासीन अधिकारी असे घोषित करील की, निवडणुकीचा निकाल चिठ्ठया टाकून सोडतीद्वारे ठरविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले परिषद सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठ्ठी काढण्यात येईल.

(९) ज्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैध रितीने निवडून आला असल्याचे घोषित करण्यात येईल.

(१०) मुक्त व निर्भयपणे निवडणुका पार पाडण्यासाठी पिठासीन अधिकारी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाचे व्हिडीओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था करील.

(११) निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी आणि बैठकीच्या कामकाजाची नोंद घेण्यासाठी पालिका सचिव पिठासीन अधिकाऱ्यास सहाय्य करील.

८. **उप महापौर पदासाठी निवडणूक.**—महापौर पदाच्या निवडणुकीसाठीची प्रक्रिया, योग्य त्या फेरफारांसह, उप महापौर पदांसाठीच्या निवडणुकीसाठी लागू असेल. मात्र, नव्याने निवडून आलेल्या महापौर हे, उप महापौर पदांच्या निवडणुकीसाठी, पिठासीन अधिकारी असतील.

## नमुना एक

[नियम ४ (अ) पहा]

नागपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर/उप महापौर पदासाठीची निवडणूक.

मी, याद्वारे ........................................ यांना ........................................ नागपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर/उप महापौर पदासाठीच्या निवडणुकीकरिता उमेदवार म्हणून नामनिर्देशित करीत आहे.

उमेदवाराचे पूर्ण नाव : ........................................

उमेदवाराचा टपालाचा संपूर्ण पत्ता : ........................................

उमेदवार हा पालिका सदस्य म्हणून जेथून निवडून आला त्या प्रभागाचे/पॅनलचे नाव/क्रमांक : ........................................

सूचकाचे पूर्ण नाव : ........................................

(सूचकाची सही)

अनुमोदकाचे पूर्ण नाव : ........................................

(अनुमोदकाची सही)

दिनांक :

## उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र

मी, याद्वारे, या नामनिर्देशनाला अनुमती देत आहे आणि माझी निवड झाल्यास, नागपूर शहर महानगरपालिकेचा महापौर / उप महापौर म्हणून काम करण्याची तयारी दर्शवीत आहे.

दिनांक : (उमेदवाराची सही)

(नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने भरावयाचे)

* सूचकाने/उमेदवाराने दाखल केलेल्या,

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक ............................................ (वेळ) .................................... (दिनांक) ............................................

दिनांक : ( अधिकाऱ्याची सही )

---

* जे लागू नसेल ते खोडावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

के. एन. खवारे,

शासनाचे सह सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 11th February 2005

*NOTIFICATION*

CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948.

No. NMC 5005/46/CR-7/UD 32.—Whereas, elections for the offices of Mayors and Deputy Mayors of the City of Nagpur Corporation is likely to be held in the third week of February 2005;

And whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action to make rules for the purposes aforesaid and for that purpose to dispense with the condition of previous publication thereof;

Now, therefore, in exercise of the powers conferred by the proviso to sub-section (*1*) of section 420 of the City of Nagpur Corporation Act, 1948 (C.P. and Berar II of 1950) and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of all existing rules, orders or instruments, in so far as they relate to the conduct of elections for the offices of Mayors and Deputy Mayors of the said Municipal Corporation, the Government of Maharashtra hereby makes the following rules; namely:-

1. *Short title and commencement.*—(1) These Rules may be called the City of Nagpur Corporation (Conduct of elections to the office of Mayor and Deputy Mayor ) Rules, 2005.

(2) They shall come into force at once.

2. *Definitions:* In these Rules, unless the context otherwise requires.—

(a) " Municipal Corporation " means a Municipal Corporation constituted under the provisions of the City of Nagpur Corporation Act, 1948 (C.P.and Berar II of 1950);

(b) words and expressions used but not defined herein shall, in relation to a Municipal Corporation, have the same meanings as assigned to them in the said Act.

3. *Special meeting for Election to the office of Mayor and Deputy Mayor.*—(1) For the purpose of holding elections to the office of Mayor and Deputy Mayor of the Corporation, a special meeting shall be held by the Corporation.

(2) The Municipal Secretary shall, in consultation with the outgoing Mayor and in case, the Mayor is to be elected after general Elections to the Corporation, in consultation with the Municipal Commissioner, fix a date for holding the special meeting under sub-rule (1):

Provided that, the date shall be so fixed, as to enable a Councillor to submit his nomination to the said posts, at least three clear days prior to such meeting.

(3) The special meeting so called, shall not be cancelled or adjourned.

4. *Submission of nomination paper.*—(1) Any councillor who intends to contest the election to the said posts shall submit his nomination in the Form I appended to these rules on the day fixed for nominations to the Municipal Secretary in person.

(2) Each nomination paper shall state the name of the candidate in full and be subscribed by one councillor as proposer and another as seconder.

(3) No councillor shall propose or second the nomination of more than one candidate.

(4) Nothing in this Rule shall prevent any candidate from submitting more than one nomination paper :

Provided that, not more than four nomination papers shall be presented by or on behalf of any candidate.

5. *Presiding Authority.*—(1) The special meeting to elect the Mayor shall be presided over by the existing Mayor or in his absence by the Deputy Mayor.

(2) If the existing Mayor or the Deputy Mayor is contesting the election to the post of Mayor he shall not be entitled to preside over the meeting.

(3) If Mayor or the Deputy Mayor is so prohibited to preside over the meeting under the provisions of foregoing sub-rule, the senior most elected member of the Corporation shall preside over the meeting.

6. *Scrutiny of nomination and withdrawal of candidature.*—(1) All nominations received by the Municipal Secretary shall be handed over to the presiding authority on the day of meeting, after the meeting begins.

(2) The presiding authority shall scrutinise all the nominations so received and may reject the nominations subscribed in contravention of Rule 4. The presiding authority shall then read out the names of all validly nominated candidates.

(3) Any candidate may withdraw his candidature by notice in writing subscribed by him and delivered to the presiding authority within 15 minutes from the time of reading out the names of duly nominated councillors under the preceding sub-rule.

(4) No person who has given a notice of withdrawal of his candidature under sub-rule (3) shall be allowed to cancel the notice.

(5) The presiding authority shall, read out to the councillors present, the name of the candidates withdrawing their candidatures.

7. *Election procedure and the declaration of election result.*—(1) If there is only one valid nomination the presiding authority shall declare such candidate as duly elected candidate to the post of Mayor.

(2) If the number of validly nominated candidates is more than one the presiding authority shall arrange the names of contesting candidates in alphabetical order.

(3) The presiding authority shall announce the name of each contesting candidate in the alphabetical order and shall take voting by show of hands. The names of the councillors who have voted in favour of that candidate shall be recorded in the minutes.

(4) The presiding authority shall ensure that.—(i) every member who desires to cast his vote is given fair and reasonable opportunity of casting his vote and the vote so cast is recorded properly against the name of the candidate in whose favour the vote is cast;

(ii) the councillor, whose vote is recorded once shall not be allowed to recast or change his vote.

(5) The presiding authority shall also record the names of those councillors who abstain from voting.

(6) The presiding authority after recording the names of the councillors who have voted or abstained from voting, shall announce the number of votes secured by each contesting candidate.

(7) The presiding authority after declaring the number of votes polled by each contesting candidate shall proceed to declare the result. The candidate who polls highest number of votes shall be declared as duly elected.

(8) In case of equality of votes the presiding authority shall declare that the result of the election shall be decided by drawing lots. The lots will be drawn by such person as may be decided by the majority of the Councillors present and entitled to vote.

(9) The candidate on whom the lot falls shall be declared to be validly elected to the said post.

(10) The presiding authority besides recording the proceedings in writing shall also cause the proceedings to be recorded by way of videography, to ensure free and fair elections.

(11) The Municipal Secretary shall assist the presiding authority in conducting the election process and recording the proceedings of the meeting.

8. *Election to the post of Deputy Mayor.*—The procedure for the election to the post of Mayor shall *mutatis mutandis* apply for the election to the post of Deputy Mayor excepting that the newly elected Mayor shall be the presiding authority for the election to the post of Deputy Mayor.

## FORM - I

[ *See* Rule 4 (a) ]

Election to the office of Mayor/Deputy Mayor of the City of Nagpur Corporation.

I hereby nominate ........................................ as a candidate for election to the office of Mayor/Deputy Mayor of the the City of Nagpur Corporation.

Full name of the candidate ..........................................................................

Full postal address of the candidate..........................................................................

Name/Number of the ward/ panel from which the .............................. candidate is elected as councillor.

Full name of the proposer ..........................................................................

(Signature of the proposer)

Full name of the seconder ..........................................................................

(Signature of the seconder)

Date :................................

### Declaration by the candidate

I hereby assent to this nomination and signify my willingness to act as Mayor/Deputy Mayor of the the City of Nagpur Corporation, if elected.

Date :...................................

( Signature of the candidate)

( To be filled by officer appointed to receive nomination papers)

Serial No. of the nomination paper ...................................... ( hour ) on ............................................ ( date) by the *proposer/candidate.

Date : .....................

(Signature of the officer)

---

* Score out the word not applicable.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

K. N. KHAWAREY,
Joint Secretary to Government.

शासकीय मुध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई